**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. अशोक भाऊसाहेब देशमुख
देशमुख गल्ली, मु.पो.ता.मोहोळ,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**
भूमि अभिलेख, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**
भूमि अभिलेख कार्यालय,
मोहोळ, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१५/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/०६/२०१० |
| ३ | **उपस्थिती**<br>**जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक,**<br>भूमि अभिलेख कार्यालय, मोहोळ, जि.सोलापूर<br>श्री.ए.पी.जाधव<br><br>**अपिलीय प्राधिकारी तथा अधीक्षक,**<br>भूमि अभिलेख सोलापूर<br>श्री.ज.व.निकम | |

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४/०९/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ६/११/२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२/१२/२००८ |
| ७ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** मो.र.नं.३८७६ चा गट नं., तो कोणाच्या नावावर आहे, सदर गट नंबरचा बिगर शेतीचा आदेश, हद्दीच्या खुणा व क्षेत्र इ. तपशील | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. अशोक भाऊसाहेब देशमुख यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३/०६/२०१० रोजी सुनावणी घेण्यात आली. 'जन माहिती अधिकारी तथा तालुका निरीक्षक, भूमि अभिलेख कार्यालय, मोहोळ, यांच्याकडून मला हवी असलेली माहिती दि.२७/०९/२००८ रोजी मिळालेली आहे. पुरविलेल्या माहितीने मी समाधानी आहे, तरी मी आयोगाकडे दाखल केलेले अपील विनाकार्यवाही काढून टाकावे', असे निवेदन अपीलकर्ता श्री.देशमुख यांनी दि.२१/०६/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 15 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. मदन गोविंद कुलकर्णी
पाटी गल्ली, मु.पो.ता.मोहोळ,
जि.सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),**
जिल्हा परिषद सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,**
नागनाथ विद्यालय मोहोळ,
जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४१८/२०१०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/०६/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २५/०८/२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २५/०९/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३/१०/२००८ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** नागनाथ विद्यालय, मोहोळ मधील सहशिक्षक श्री.सुनिल गायकवाड यांची नेमणूक, वैद्यकीय मंडळाचे फिटनेस सर्टिफिकेट तदनुषंगिक माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. मदन गोविंद कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३/०६/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'श्री.सुनिल गायकवाड, सहशिक्षक यांची संपूर्ण माहिती मला मिळालेली आहे. माझी कोणतीही तक्रार नाही. मिळालेल्या माहितीने माझे समाधान झाले असल्याने माझा अपील अर्ज निकाली काढावा', असे अपीलकर्ता श्री.कुलकर्णी यांचे दि.१२/६/२०१० रोजीचे निवेदन जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नागनाथ विद्यालय, मोहोळ, जि.सोलापूर श्री.डी.एम.देशपांडे यांनी दि.१४/०६/२०१० च्या पत्रान्वये आयोगास सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 25 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. विजयकुमार भगवानराव उघडे
४१, भारत को-ऑप. हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
मौलाली चौक, सोलापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा उपनिबंधक (शहर विभाग),**
सहकारी संस्था, सोलापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उपनिबंधक (शहर विभाग),**
सहकारी संस्था, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२०/२०१०/सोलापूर |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** तुळजाभवानी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, सोलापूर या पतसंस्थेच्या अध्यक्ष व संचालक मंडळाची निवडणूक, कर्जवाटप, स्थापनेपासूनचे लेखा परिक्षण अहवाल तदनुषंगिक एकूण ६ मुद्दे | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. विजयकुमार भगवानराव उघडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या

मुदतीत केले नसल्याने सदर अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
दि :- 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं.१५४, सेक्टर नं.१९,
कोयनानगर, चिंचवड पूर्व,
पुणे-१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**१. अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**२. अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक,**
टी-ब्लॉक, हॉकी स्टेडियम जवळ,
नेहरु नगर जवळ, भोसरी, पुणे

**उत्तरवादी**

**१. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (उद्यान-स्थापत्य),**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे-१८

**२. जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक,**
टी-ब्लॉक, हॉकी स्टेडियम जवळ,
नेहरु नगर जवळ, भोसरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२१/२०१०/पुणे+१४४१/२०१०/पुणे १४५१/२०१०/पुणे+१४५३/२०१०/पुणे+ १४५४/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) उद्यानातील दंश करणाऱ्या किटकांमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळणेबाबत | |

| | |
|---|---|
| | २) कंत्राटदार व धार्मिक कार्यक्रमांमुळे झालेल्या त्रासाच्या बदल्यात नुकसान भरपाई मिळण्याबाबत<br>३) सेक्टर १९, कोयनानगर मधील मोकळी जागा क्र.१ च्या संदर्भातील माहिती |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपिले केलेली आहेत. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपिले करणे आवश्यक आहे. सबब या अपिलांवर कार्यवाही करण्यात येणार नाही. श्री.लोहार यांना यासंदर्भात अनेकदा जाणीव देऊनही अपिलांबाबत याच पध्दतीची पुनरावृत्ती ते करीत आहेत, याबद्दल त्यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

वरील पाचही अपिले दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 30 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं.१५४, सेक्टर १९,
कोयनानगर,
चिंचवड पूर्व, पुणे-१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा शहर अभियंता,**
पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी,
पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (उद्यान-स्थापत्य),**
पिंपरी चिंचवड, महानगरपालिका, पिंपरी,
पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२२/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २४/१०/२००९ व २५/१०/२००९ |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५/१२/२००९ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १९/१२/२००९, २४/१२/२००९ |
| ५ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १९/०३/२०१० |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सीमा-भिंती ताब्यात घेण्याच्या प्रस्तावास शासनाची मंजुरी दिली आहे काय, त्यासाठीचा आराखडा व अंदाजपत्रक तयार केले आहे काय, त्यास महानगरपालिकेने ठरावाद्वारे संमत्ती दिली आहे काय? तदनुषंगिक एकूण १२ मुद्दे | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती - मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 15 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. रघुनाथ मकडू लोहार
प्लॉट नं.१५४, सेक्टर १९,
कोयनानगर, चिंचवड पूर्व,
पुणे-१९

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा मुख्य उद्यान अधीक्षक,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,
पुणे-१८

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उद्यान अधीक्षक,**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,
पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२५/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-**<br>१) पिंपरी चिंचवड शहराच्या विकास आराखडयानुसार उद्याने, क्रीडांगणे व मनोरंजन केंद्रे इ. च्या आरक्षणातील फेरबदलाबाबत<br>२) उद्यानातील दंश करणाऱ्या किटक व प्राण्यांचा त्रास व त्यासंदर्भातील नुकसान भरपाईबाबत | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. रघुनाथ मकडू लोहार यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

पुणे.
दि :- 25 JUN 2010

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा
१४, मोतीलाल तालेरा रोड,
पुणे-१

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
एकात्मिक घटक, नवीन प्रशासकीय इमारत,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता,**
सार्वजनिक बांधकाम उप विभाग,
हवेली क्र.१, पुणे, येरवडा-नगर रोड,
पुणे-६

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२९/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कार्यकारी अभियंता, एकात्मिक घटक, पुणे यांच्या दि.६/०४/२००९ च्या पत्राच्या संदर्भातील व कार्यकारी अभियंता सा.बां. विभाग (पूर्व), पुणे यांच्या दि.२९/०९/१९९७ च्या पत्राच्या संदर्भातील धारिकांचे अवलोकन करण्यास मिळणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा यांनी माहिती-मागणी अर्जाच्या अनुषंगाने माहिती न मिळाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. सदर अपिलासोबतची कागदपत्रे

विचारात घेता अपीलकर्ते सातत्याने एकाच विषयाचा पाठपुरावा करीत असून त्यांनी अभिलेखांचे अवलोकन करणे योग्य ठरेल. आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:-

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप विभाग, पुणे यांनी अपीलकर्ता श्री. कन्हैयालाल मोतीलाल तालेरा यांना संबंधित धारिकांचे अवलोकन करु द्यावे, व त्यांनी मागणी केल्यास संबंधित कागदपत्रांच्या छायांकित प्रती सशुल्क द्याव्या.

पुणे.
दि :- 21 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दत्तात्रय विठ्ठलराव पोसा
१७१३, दत्तनगर,
सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक,**
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित,
जुहू सुप्रिम शॉपिंग सेंटर,
विले पार्ले (प.)
मुंबई-४९

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक,**
वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित,
सोलापूर जिल्हा कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय आवार,
सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३०/सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २३/०६/२०१० |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२/१२/२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १४/०१/२००९ |
| ६ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, सोलापूर यांनी सोलापूर जिल्हयातील सन २००५-२००८ या कालावधीत कर्ज वाटप केलेल्या लाभार्थ्यांचा तपशील व कर्जाची रक्कम इ. माहिती | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. दत्तात्रय विठ्ठलराव पोसा यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलावर दि.२३/०६/२०१० रोजी सुनावणी मुक्रर करण्यात आली होती. 'मला माहिती मिळालेली असून माझे समाधान झाले आहे. माहितीविषयी माझी काही तक्रार नाही', असे अपीलकर्ता श्री.पोसा यांचे दि.२१/०६/२०१० चे निवेदन जन माहिती अधिकारी तथा जिल्हा व्यवस्थापक, वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ मर्यादित, सोलापूर जिल्हा कार्यालय, सोलापूर यांनी आयोगास दि.२१/०६/२०१० च्या पत्रान्वये सादर केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे,
दि :- 16 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.पांडुरंग शेषाराम शिंदे
जय मल्हार चौक, एस.टी.डेपोमागे, बुधवार पेठ, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,
अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३२ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.पांडुरंग शेषाराम शिंदे
जय मल्हार चौक, एस.टी.डेपोमागे, बुधवार पेठ, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक कामगार आयुक्त,
अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे श्री.आर.डी.सावंत

| | | |
|---|---|---|
| **जन माहिती अधिकारी** तथा सरकारी कामगार अधिकारी,<br>अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे<br>विद्यमान-श्री.एस.एन.फुटाणे, तत्कालीन-श्री.एस.व्ही.भोर | | |
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२८.८.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.९.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.१६.१२.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.२.२.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकात एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.३१.३.२०१० रोजी घेण्यात आली.

कार्यालयाच्या कक्षेतील माहिती आपण मागितलेली असतानाही विलंबाने दिली. काही माहिती 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'नंतर दिली. नुकसानभरपाईची मागणी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे यांनी फेटाळून लावली. रुपये २५००० नुकसानभरपाई मिळावी व उर्वरित माहिती नि:शुल्क मिळावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.पांडूरंग शेषाराम शिंदे यांनी केली.

श्री.शिंदे यांच्या दि.२८.८.२००८ च्या अर्जानुसार दि.१५.९.२००८ रोजी माहिती दिली. प्रथम अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे यांच्याकडे त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये विहित केलेल्या मुदतीतपेक्षा ५६ दिवस विलंबाने अपील केले होते, तरीही अपिलीय प्राधिकारी यांनी दोन तारखांना सुनावणी घेतली व मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ बाबतची तपशिलवार माहिती नि:शुल्क देण्याचे

आदेश दि.२२.२.२००९ रोजी दिले. मुद्दा क्र.२,५ मध्ये खुलासा, भाष्य याची मागणी केली आहे, ती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, असे प्रतिपादन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे श्री.एस.व्ही.भोर व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे श्री.एस.एन.फुटाणे यांनी केले. अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक कामगार आयुक्त, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे यांनी दिलेल्या आदेशानुसारची माहिती दि.२०.४.२००९ रोजी दिली. उपकामगार आयुक्त कार्यालयाकडील ही माहिती असल्यामुळे त्यांना पत्र पाठवून माहिती प्राप्त करून घेऊन दिली. अपीलकर्ता यांच्या घरी जाऊन माहिती दिली असून तशी पोहोच घेतली आहे, असे निवेदनही श्री.एस.एन.फुटाणे यांनी केले. पूरक कागदपत्रे त्यांनी सादर केली.

जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे यांनी अपीलकर्त्यास विहित मुदतीत उत्तर दिले आहे. अन्य कार्यालयांकडील माहितीसाठी अर्ज वर्ग करणे अथवा त्या कार्यालयांना पत्र पाठविणे ही कार्यवाही जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे यांनी अधिक तत्परतेने करणे आवश्यक होते. त्याबाबत विद्यमान व तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे श्री.एस.एन.फुटाणे व श्री.एस.व्ही.भोर यांना समज देण्यात येत आहे. मुद्दा क्र.२,५ यासारखी विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही, हे जन माहिती अधिकारी तथा सरकारी कामगार अधिकारी, अप्पर कामगार आयुक्त कार्यालय, पुणे-मुंबई रोड, पुणे श्री.एस.एन.फुटाणे यांचे प्रतिपादन रास्त आहे.

अपीलकर्ता श्री.पांडुरंग शेषाराम शिंदे यांनी पुढीलप्रमाणे नुकसानभरपाईची मागणी दि.२४.२.२००९ च्या पत्रात केली आहे :

| | | |
|---|---|---|
| १. | अपील दाखल करणेचे वेळी (प्रवास खर्च) | ४०० |
| २. | दोन वेळा सुनावणीचे वेळी (प्रवास खर्च) | ८०० |
| ३. | तीन दिवसाची रोजी बुडाली (दिवसाला ३००/- प्रमाणे) | ९०० |
| ४. | पोस्टेज अधिक मानसिक त्रास | ४०० |
| | | २५०० |

दरम्यानच्या कालावधीत खर्चात वाढ झाल्यामुळे ही रक्कमही वाढविण्याची मागणी श्री.शिंदे यांनी दि.३.१३.२०१० च्या निवेदनात केली आहे. अपील दाखल करण्यासाठी झालेल्या प्रवास खर्चासह नुकसानभरपाईची मागणी योग्य नसून ती अमान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
25 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. भिमराव आण्णा खाटमोडे
३६/१२४, विठ्ठल रखुमाई हौसिंग सोसायटी, **अपीलकर्ता**
हिंगणे खुर्द,
सिंहगड रोड, पुणे-५१

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा चाळ अधीक्षक तथा कल्याण अधिकारी,**
पुणे महानगरपालिका,
पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा क्षेत्रिय अधिकारी,**
घोले रोड क्षेत्रिय कार्यालय, पुणे महानगरपालिका,
पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३३/२०१०/पुणे |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २६/०२/२०१० |
| ३ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** कॉलनी क्र.११, चाळ क्र.४१ व खोली क्र.१९७ या घराचे बांधकाम क्षेत्र किती, सदर घर महानगरपालिकेच्या जागेवर अतिक्रमण करुन बांधले असल्यास अतिक्रमिक जागेचे मोजमाप, अतिक्रमिक कंपौंड चे मोजमाप, मंजूर नकाशा व अतिक्रमणावरील प्रस्तावित कारवाई बाबतचा खुलासा | |

**<u>विवेचन</u>**

अपीलकर्ता श्री. भिमराव आण्णा खाटमोडे यांनी राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या अपिलासोबतच्या कागदपत्रांवरुन त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९(१)

अन्वये अपिलीय प्राधिका-याकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर )
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ.**

**पुणे.**
दि :- 22 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.अशोक विनायक कुलकर्णी
सदनिका क्र.४, इमारत क्र.५,
निर्मिती सोसायटी, आपटे कॉलनी,
माळवाडी, पुणे-५८

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव,**
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३८/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अपंगाच्या विशेष शाळेतील निवृत्त कर्मचाऱ्यास निवृत्ती वेतन मिळण्यास होत असलेल्या विलंबाची माहिती | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. अशोक विनायक कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबतची कागदपत्रे लक्षात घेता माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(१) अन्वये अपिलीय प्राधिकाऱ्यांकडे प्रथम अपील केले नसल्याचे दिसून येते. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 29 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

श्री.महादेव मंगलू राठोड
मु.पो.कोंडी (तांडा), ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत),
पंचायत समिती, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा ग्रामसेवक कोंडी (तांडा),
ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४३८ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.५.२०१० |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महादेव मंगलू राठोड
मु.पो.कोंडी (तांडा), ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा विस्तार अधिकारी(पंचायत),
पंचायत समिती, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर श्री.एस.एस.खरवस

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.२५.९.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ११.११.२००८ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१६४.२००९ |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२८.५.२०१० रोजी घेण्यात आली.

ग्रामपंचायतीच्या संदर्भातील सन २००५ ते २००८ या काळातील आपण मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोंडी(तांडा), ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यांनी सातत्याने अपुरी दिली. वार्षिक आराखडा दिला नाही. मोबाईल टॉवरची नोंद केलेली नाही व ती का केली नाही याचा खुलासा केलेला नाही. अशा प्रकारे दर वेळी अपुरी माहिती देणारे जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोंडी(तांडा), ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर यांच्यावर कारवाई व्हावी, अशी मागणी अपीलकर्ता श्री.महादेव मंगलू राठोड यांनी केली.

अपीलकर्त्याच्या मूळ अर्जानुसार उपलब्ध माहिती मुदतीत दिली. त्यानंतर अतिरिक्त मुद्दे उपस्थित करून त्यांनी माहिती मागितली, ती तयार करून रजिस्टर्ड टपालाने पाठविली असता त्यांनी टपाल घेतले नाही. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी आणखी काही माहिती दिली. परंतु तेव्हाही माहितीत त्रुटी असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. ते वारंवार माहिती मागतात व पूर्ण माहिती दिली तरी अपूर्ण असल्याची तक्रार करून मूळ अर्जाव्यतिरिक्तचे मुद्दे उपस्थित करतात. त्रास देण्याची त्यांची भूमिका आहे. सर्व कागदपत्रांनिशी हे दाखवून देता येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा विस्तार अधिकारी(पंचायत), पंचायत समिती, उत्तर सोलापूर, ता.उत्तर सोलापूर, जि.सोलापूर श्री.एस.एस.खरवस यांनी केले.

उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.राठोड यांनी मूळ अर्जापेक्षा अतिरिक्त मुद्दे प्रथम अपिलात व अन्य निवेदनामध्ये मांडल्याचे दिसून येते. तसेच त्या अनुषंगाने भाष्य व सूचना केली असून खुलासेही विचारले आहेत, व माहिती अपूर्ण असल्याची तक्रार केली आहे. ही कार्यपध्दती व विचारणा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ नुसार योग्य नाही. मूळ अर्जानुसारच माहितीबाबतचे म्हणणे विचारात घेतले जाईल, याची समज अपीलकर्त्यास देण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
11 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री. दिलीप ज्ञानेश्वर फडके
स.नं.२०/२, क्लासिक दर्शन,
काशिनाथ पाटील नगर,
बालाजी नगर, पुणे-४३

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा तहसीलदार,**
तहसील कार्यालय वेल्हा,
जि.पुणे

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,**
तहसील कार्यालय वेल्हा,
जि.पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४४४/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** सन २००९ या वर्षी वेल्हा तालुक्यास शासनाकडून किती अन्न-धान्य व रॉकेल प्राप्त झाले व त्याचे गाव निहायवाटप कसे केले याबाबतचा विस्तृत तपशील | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. दिलीप ज्ञानेश्वर फडके यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत योग्य ते शुल्क (रु.२०/- चे मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर ) जोडलेले नाही. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुंवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

पुणे.
दि :- 21 JUN 2010

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ.

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१

(१)श्री.सुभाष आप्पाराव चव्हाण ( अ.क्र.१४५२)
(२)श्री.प्रकाश विष्णू आरे (अ.क्र.१४५३)
मु.पो.उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
माढा, ता.माढा, जि.सोलापूर उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, उंदरगाव, ता.माढा, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५२+१४५३ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३१.३.२०१० |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अ.द.खंडागळे

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.५.११.२००८ ( अ.क्र.१४५२)<br>दि.१०.१२.२००८ (अ.क्र.१४५३) |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.२.१२.२००८ ( अ.क्र.१४५२)<br>दि. -- (अ.क्र.१४५३) |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि.२२.११.२००८ ( अ.क्र.१४५२)<br>दि.१.१.२००९ (अ.क्र.१४५३) |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.१२.११.२००८ ( अ.क्र.१४५२)<br>दि.२९.१.२००९ (अ.क्र.१४५३) |
| ७ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ) छायाप्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, उंदरगाव, ता.माढा. जि.सोलापूर या संस्थेचे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा सचिव श्री.दत्तात्रय नारायण थोरात यांनी अपीलकर्ता श्री.सुभाष आप्पाराव चव्हाण व श्री.प्रकाश विष्णू आरे यांचे माहिती-मागणीच्या अर्जाचे रजिस्टर्ड टपाल स्वीकारले नाही. श्री.चव्हाण यांनी अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांच्याकडे अपील केल्यानंतर श्री.थोरात यांनी अपीलकर्त्यास शुल्क कळविले. तत्काळ माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर यांनी दिल्यानंतरही श्री.थोरात यांनी माहिती दिली नाही. दरम्यान बनावट कगदपत्रे तयार करणे आदी आरोपांवरून श्री.थोरात यांना निलंबित करण्यात आले. त्यानंतर विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सचिव, उंदरगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित, उंदरगाव, ता.माढा. जि.सोलापूर श्री.ज्ञानदेव एकनाथ पवार यांनाही वारंवार सूचना देऊनही त्यांनी माहिती दिली नाही. त्यामुळे कसुरीबद्दल त्यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कारवाई त्यांचे नियंत्रण अधिकारी असलेले मुख्य कार्यकारी अधिकारी, सोलापूर जिल्हा देखरेख सहकारी संस्था मर्या., सोलापूर यांच्याकडे दि.२३.११.२००९ च्या पत्रान्वये प्रस्तावित करण्यात आली आहे, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, माढा, ता.माढा, जि.सोलापूर श्री.अ.द.खंडागळे यांनी केले.

सदर संस्था विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था असून नाबार्डकडून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक व बँकेतर्फे सेवा संस्थेच्या सभासद शेतकऱ्यांना अनुदान दिले जाते. नियमित

कर्जपरतफेड करणारास ४ टक्के व्याजमाफी असून ही व्याजमाफी सरकार बॅंकेला देते, असेही श्री.खंडागळे यांनी नमूद केले. परंतु संबंधित सहकारी संस्थेला थेट व भरीव शासकीय अनुदान मिळत असल्याचे त्यातून पुरेसे स्पष्ट होत नाही. तशा पुराव्याच्या स्वरूपाचा तपशील अपीलकर्त्यांनीही सादर केलेला नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ मधील तरतुदीनुसार संबंधित संस्थेला भरीव शासकीय अनुदान / अर्थसहाय्य मिळत असल्याचे पुरावे सादर झाल्याशिवाय संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण' मानता येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**पुणे**
15 JUN 2010

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११ ००१

श्री.रविंद्र संपत दळवी
मु.पो.लोणीकंद,
ता.हवेली, जि.पुणे

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-१

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक,**
जिल्हाधिकारी कार्यालय,
पुणे-१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४५६/२०१०/पुणे |
| २ | **मूळ अर्जान्वये केलेली मागणी :-** अप्पर जिल्हाधिकारी यांचे शासकीय वाहन क्र.एम.एच.१२ ए एच ७०७० व एम.एच.१२ पी १०४ या गाडीमध्ये भरलेल्या इंधनाच्या पावत्या व तदनुषंगिक माहिती | |

## <u>विवेचन</u>

अपीलकर्ता श्री. रविंद्र संपत दळवी यांनी राज्य माहिती आयोगाकडे एकापेक्षा जास्त माहिती-मागणी अर्जांसाठी एकत्रितपणे अपील केले आहे. प्रत्येक अर्जासाठी आयोगाकडे स्वतंत्र अपील करणे आवश्यक आहे. तसेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील हे माहितीचा अधिकार

अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये विहित केलेल्या ९० दिवसांच्या मुदतीत केले नसल्याने सदर अपील मुदतबाहय आहे. सबब या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर नाकारण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ. *

पुणे.
दि :- 29 JUN 2010